**वाडा भाड्याने देणे आहे**

बस स्थानकापासून जवळ आणि पोस्ट ऑफिससमोरील मध्यवर्ती ठिकाणी असलेला करजगी ता. अक्कलकोट या गावातील 5 हजार स्वे. फूट बांधकाम असलेला जुना वाडा तळघरासाहित भाड्याने देणे आहे. बँक, पतसंस्था, वैद्यकीय व्यवसाय आणि शासकीय कार्यालयासाठी बहुउपयोगी.

अधिक माहितीसाठी संपर्क: 9975434591



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



**सेवेकरी भरती**

१) सुपरवायझर- १ । २) पुजारी- १

३) शेतगडी जोडी- २ । ४) सफाई सेवेकरी- १

५) वॉचमन- ३ । ६) स्वयंपाक बाई-१

याप्रमाणे सेवेकरी भरती चालू आहे होतकरू गरजू यांनी संपर्क साधावा

पत्ता:- श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट अक्कलकोट-सोलापूर रोड १२१ कान्होळी अक्कलकोट

संपर्क:- 8625050111



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १७० वा | शुक्रवार, दि. ०७ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# राहुल सोलापूरकरचा माफीतही कावा; मराठी अभिनेत्याने व्यक्त केला संताप

# अखेर हरामी राहुल्याचा राजीनामा; लोकं रस्त्यावर, इशाऱ्यानंतर उपरती









**पुणे (कटूसत्य वृत्त) :-** हरामखोर राहुल सोलापूरकर याने एका पॉडकास्टमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांबाबत वादग्रस्त वक्तव्य केले होते.

माफिवीराचा वंशज राहुल सोलापूरकरच्या विरोधात आंदोलने होत आहेत. टीकेची झोड उठली आहे. आता अभिनेते किरण माने यांनीही राहुल सोलापूरकरला चांगलंच सुनावलं आहे. या वक्तव्यानंतर राहुल सोलापूरकरनी जाहीर माफी मागितली. याच माफीच्या व्हिडिओवर किरण माने यांनी प्रतिक्रिया दिली आहे. राहुल सोलापूरकरने माफी मागतानाही महाराजांचा जाणीवपूर्वक अपमान केल्याचे माने यांनी म्हटले आहे.

**किरण माने यांची पोस्ट**

किरण माने यांनी फेसबुकवर एक पोस्ट लिहीली आहे. यात ते लिहीतात की, माझ्या बहुजन शिवभक्तांनो, शिवजयंतीला तुम्ही कुणाचे व्याख्यान आयोजित करत आहात त्याचा मेंदू आणि विचार पुर्ण तपासुन बोलवा.

गेली अनेक दशकं छ. शिवरायांचा जयजयकार करत, त्यांच्याविषयी खोट्या गोष्टी पेरणाऱ्या एका पुणेरी बाजारबुणग्या शिवशाहीराची पिलावळ मनुवाद्यांचा छुपा अजेंडा राबवत आहे. प्रोपोगंडा सिनेमाप्रमाणेच व्याख्यानांमधूनही हे विष पेरलं जातंय !

काल तो राहुल सोलापूरकर माफी मागताना जे बोलला ते नीट ऐका म्हणजे या मनुवादी बांडगुळांचं कपट कळेल. माफी मागतानाही या भिकारड्याने 'छ. शिवराय हे 'सामदामदंडभेद' या चार पद्धतीने मोठे राज्यकर्ते होऊन गेले.' हा निव्वळ खोटा आणि शिवकार्य हीन लेखण्याचा कावा खेळलाय. छ. शिवराय मोठे ठरले ते गोरगरीब, कष्टकरी रयतेची घेतलेली काळजी आणि योजनाबद्ध युद्धनितीमुळे !

'सामदामदंडभेद' हा निगेटिव्ह शब्दप्रयोग जाणीवपूर्वक खुपसला आहे. 'राज्यकर्ते सामदामदंडभेद वापरतात' म्हणजे काय हो??? भ्रष्टाचार करा, बलात्कार करा, खून करा पण माझ्या सत्तेत सामील होऊन माझी खुर्ची बळकट करा... तुमच्यावर कारवाई होणार नाही. खोकीच्या खोकी ओतून पक्ष फोडा पण आमची सत्ता मजबूत करा. जो झुकत नाही त्याला तुरुंगाची भीती दाखवा आणि वाकवा. घराघरात फूट पाडा. याला म्हणतात सामदामदंडभेद. शिवरायांनी राज्यकारभारात ही नीती कधीच वापरली नाही.

'अहो, कट्टर विरोधात असलेल्या सावित्रीबाई उर्फ मल्लम्मा राणीवर हात टाकला म्हणून स्वतःच्या सरदाराला डोळे काढून आयुष्यभर तुरुंगात टाकणारे आणि तिचा जिंकलेला किल्ला तिला परत देणारे राजे होते ते ! सामदामदंडभेदात हे भान नसतं. छ. शिवरायांनी स्वतः नेमलेल्या पाटलानं प्रजेतल्या एका गरीबाच्या मुलीवर बलात्कार केला म्हणून राजांनी त्याचे हातपाय तोडले होते. आजकालचे सामदामदंडभेदानं सत्तेत आलेले राज्यकर्ते स्वतः नेमलेल्या मंत्र्यांवर काय कारवाई करतात हो???

राजांचा जयजयकार तर करायचा..

त्यांना 'महान' तर म्हणायचं पण गुणगान गात-गात शाब्दिक खेळ खेळून त्यांचं कार्य मात्र लहान करायचं हे कपट वर्षानुवर्षे सुरू आहे... कधी अलगदपणे 'लाच' शब्द वापरायचा तर कधी 'सामदाम'... कधी न भेटलेल्या कुणाला थेट गुरु ठरवायचं तर कधी खऱ्या गुरु असलेल्या माता जिजाऊंचा आणि शहाजीराजेंचा मानभंग करायचा... प्रोपगंडा सिनेमांचा एक-एक सिन घेऊन मी त्यातला हा कावा सांगू शकतो. आपल्या सर्व महामानवांबाबत हे केलं जातंय. बहुजनांनो सावध रहा ! अशा शब्दांत किरण माने यांनी राहुल सोलापूरकर वर टीका केली आहे.

राहुल सोलापूरकर याच्याविरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी अमोल मिटकरी यांनी राज्यपालांकडे केलीय तर पुण्यात ठाकरेंच्या शिवसेनेनं राहुल सोलापूरकर याच्या घराबाहेर जोरदार निदर्शने केली. शिवसेना उबाठाच्या शिवसैनिकांनी निदर्शनं करत राहुलच्या घराकडे कूच केली. मात्र पोलिसांनी त्यांना अडवल्यानं गनिमी काव्यानं ते राहुल सोलापूरकर याच्या घरावर धडकले. पोलिसांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी तिथेच ठिय्या मांडला. साधारण तासभर शिवसैनिकांनी राहुल सोलापूरकरच्या घराबाहेर जोरदार निदर्शने केली. त्यानंतर मात्र पोलिसांनी हे आंदोलन मोडून काढलं. राहुल सोलापूरकर घरात नसल्याचे सांगत पोलिसांनी आंदोलकांना पांगवलं.

शिवप्रेमींप्रमाणेच खासदार उदयनराजे भोसले यांनीही आक्रमकपणे आपला संताप व्यक्त केलाय. राहुल सोलापूरकर हा कोण आहे? त्याचे विधान ही चूक नाही तर घोडचूक आहे. अशा व्यक्तींच्या जिभा हासडल्या पाहिजेत. समाजात अशाच विकृतांमुळे तेढ निर्माण होते. समाजातील अशी प्रवृत्ती ठेचून काढली पाहिजे. राहुल सोलापूरकर सारख्या प्रवृत्तींना गोळ्या घालून मारलं पाहिजे. शिवरायांनी लाच दिली म्हणणारे सोलापूरकर ही तर औरंजेबाची अवलाद आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल सोलापूरकरवर कारवाई करावी. तुरुंगात टाकून त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला पाहिजे, अशी मागणी उदयनराजे भोसले यांनी केली.

**अखेर राहुल सोलापूरकरचा राजीनामा; लोकं रस्त्यावर, इशाऱ्यानंतर उपरती**

अभिनेता राहुल सोलापूरकरने छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल वादग्रस्त वक्तव्य केल्यानंतर राज्यभरातून संताप व्यक्त होत आहे. राजकीय नेत्यांकडूनही सोलापूरकरच्या वक्तव्यावर टीका करताना त्याला जिथं दिसेल तिथं बदडा अशी भावना व्यक्त करण्यात आली.

राहुल सोलापूरकर ज्या ज्या संस्थांवर आहेत, तिथून त्याचा राजीनामा घ्या, त्याला कुठेही अभिनयाचं काम देऊ नका, अशा मागणीसह पुणेकर रस्त्यावर उतरल्याचं पाहायला मिळालं.

आता, राहूल सोलापुरकर यांनी भांडारकर प्राच्यविद्या संस्थेच्या विश्वस्त पदाचा राजिनामा दिला आहे. भांडारकर संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष नंदकुमार फडके यांच्या कार्यालयात राहूल सोलापुरकरनी राजिनामा पाठवून दिलाय.

छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल राहूल सोलापूरकर यांनी अवमानकारक वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ भांडारकर संस्थेच्या विश्वस्तपदावरुन त्याला हटवण्याची मागणी काही संघटनांकडून होत होती.

अखेर वाढता विरोध आणि शिवभक्तांची नाराजी लक्षात घेऊन राहुल सोलापूरवर राजीनाम्यासाठी दबाव वाढल्यानंतर आपल्या पदाचा राजीनामा दिला.

भारतातील वैज्ञानिक ओरिएंटोलॉजीचे अग्रणी प्रणेते रामकृष्ण गोपाळ भंडारकर यांच्या नावाचे आणि त्यांच्या कार्याचे स्मरण करण्यासाठी ६ जुलै १९१७ रोजी पुण्यातील भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूटची स्थापना करण्यात आली. हीच संस्था छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल खोटी व चुकीची माहिती पसरविण्यात आघाडीवर असल्याचं मत शिवप्रेमींच आहे.

# हॉटेल ग्रँड रेसिडेन्सीचे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते आज उद्घाटन



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर पासून पंधरा ते वीस मिनिट अंतरावर असलेल्या करकंब नजीक उभारण्यात आलेल्या हॉटेल ग्रँड रेसिडेन्सी या पंचतारांकित हॉटेलचे उद्घाटन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते शुक्रवार दिनांक ७ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार असून या कार्यक्रमासाठी माजी गृहमंत्री बाळ नांदगावकर, भाजपाचे पक्षनेते प्रवीण दरेकर, आमदार अभिजीत पाटील, आमदार राजू खरे, शिवसेनेचे शिवाजी सावंत, मनसेचे अनिल शिदोरे, अविनाश अभ्यंकर, सहकार शिरोमणीचे चेअरमन कल्याणराव काळे, माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले उपस्थित राहणार असल्याची माहिती मनसे नेते दिलीपबापू धोत्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

देशभरातून भाविक पंढरपुरात श्री विठ्ठल रुक्मिणीमातेच्या दर्शनासाठी येत असतात या येणाऱ्या भाविकांची सोय व्हावी.

या उद्देशाने पंढरपूर पासून पंधरा ते वीस मिनिट अंतरावर असलेल्या करकंब नजीक मनसे नेते दिलीपबपू धोत्रे यांच्या संकल्पनेतून हॉटेल ग्रँड या पंचतारांकित हॉटेलची १ लाख ४ हजार स्क्वेअर फुट जागेत निर्मिती करण्यात आली आहे.

यामध्ये ५० रूम, तीन हजार स्क्वेअर फुटचा हॉल, पंचवीस हजार स्क्वेअर फुट लॉन, स्विमिंग पूल, प्रशस्त पार्किंगची सोय करण्यात आली आहे. याचबरोबर हॉटेल श्रीयश रेस्टॉरंटची मुंबईच्या धरतीवर निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये पंचतारांकित हॉटेल प्रमाणे विविध प्रकारच्या जेवणाचे मेनू मिळणार आहेत. याद्वारे १०० तरुणांना रोजगार मिळणार असल्याची माहिती मनसेनेचे दिलीप धोत्रे यांनी दिली.

# डॉ. जगदाळे जयंतीनिमित्त समाज दिन साजरा



**बार्शी, (कटुसत्य वृत्त):-** कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीच्या निमित्ताने श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने बार्शी येथे मोठ्या उत्साहात समाज दिन साजरा करण्यात आला. संस्थेंतर्गत असणाऱ्या विद्यालय, महाविद्यालयांच्या विद्यार्थी, विद्यार्थिनींनी विविध कलागुणांचे सादरीकरण करण्यात आलेल्या शोभायात्रेचे ठिकठिकाणी फुलांच्या पायघड्या, रांगोळी आणि खाऊ वाटपाने स्वागत करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सालाबादप्रमाणे तुळजापूर ते बार्शी आलेल्या कर्मवीर ज्योतचे स्वागत करण्यात आले. यानंतर शोभायात्रेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव प्रकाश पाटील, (पान 2 वर..)

# शिक्षण विभागात पुन्हा वरिष्ठ सहाय्यक म्हस्के २० हजाराची लाच घेताना जाळ्यात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हापरिषेदीतील लाचखोरीचे प्रकरण काही केल्या कमी होताना दिसत नाही. गुरुवारी सायंकाळी २० हजरांची लाच घेताना वरिष्ठ सहाय्यक अधिकारी रंगेहात सापडला. घनशाम अंकुश म्हस्के असेत्या लाचखोर अधिकाऱ्याचे नाव आहे. या प्रकरणामुळे जिल्हा परिषदेत एकच खळबळ उडाली आहे. एक माध्यमिक शाळेतील शिक्षकाच्या निवड श्रेणी प्रस्ताव प्रकरणी घनशाम म्हस्के यांनी वरीष्ट वेतन श्रेणी मंजूर करण्यासाठी म्हस्के यांनी एका शिक्षकाच्या निवडश्रेणी मान्यतेसाठी ४० हजारांची लाच मागितली होती. शेवटी ३५ हजारवर तडजोड झाली. या पैकी २० हजार रुपये स्वीकारताना माध्यमिक शिक्षण विभागातील वरिष्ठ सहाय्यक घनश्याम अंकुश मस्के (वय 43, रा. प्लॉट नंबर 33, मेरगू अपार्टमेंट, अक्कलकोट रोड सोलापूर) याला लाच लुचपत विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. उपाधीक्षक गणेश कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महाडिक यांच्या पथकाने हि कारवाई केली.

याबाबत एका शिक्षकाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. संबंधित शिक्षकाची सेवा 24 वर्षे पूर्ण झाली होती. त्यामुळे त्या शिक्षकाला निवड श्रेणी मिळणार होती. निवड श्रेणी मिळण्याकरता त्यांनी रीतसर माध्यमिक शिक्षण विभागात 25 ऑक्टोबर 2023 रोजी प्रस्ताव दाखल केला होता. हा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठ सहाय्यक मस्के यांच्याकडे आला होता. प्रस्ताव तपासून वरिष्ठांकडे मान्यतेसाठी पाठवण्यासाठी मस्के याने चाळीस हजार लाचेची मागणी केली. तडजोडीअंति बत्तीस हजार देण्याचे ठरले. यातील पाच हजार रुपये त्याने पूर्वीच घेतले होते. त्यानंतर पहिला हप्ता म्हणून वीस हजार देण्याचे ठरले. याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलिसांनी 6 फेब्रुवारी रोजी खातरजमा केली. त्यानंतर गुरुवारी माध्यमिक शिक्षण विभागात सापळा लावला. दुपारी त्या शिक्षकाकडून 20 हजाराची लाच घेताना वरिष्ठ सहाय्यक मस्के याला लाचलुचपत प्रतिबंधक पोलिसांनी रंगेहात पकडले. त्याच्याविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पुणे विभागाचे अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक उमाकांत महाडिक यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वी केली.




## संपादकीय

# मराठा सेवा संघाची मागणी योग्य

मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरुषोत्तम खेडेकर यांनी महाराष्ट्र शासनाकडे केलेली मागणी अतिशय योग्य असल्याने आमच्या वाचकांसाठी जशीच्या तशी...

शिवप्रेमी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने दिनांक ५ फेब्रुवारी २०२५ रोजी शिवनेरी किल्ला, ता.जुन्नर जिल्हा पुणे येथे १९ ते २१ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त "हिंदवी स्वराज्य (महादुर्ग) महोत्सवाचे आयोजन करण्यासाठी ४.९१ कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली आहे. याबद्दल महाराष्ट्र शासनाचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील काळात सदिच्छा...

हा आनंद व्यक्त करताना आमची मायबाप शासनास विनंती आहे की कृपया छत्रपती शिवाजी महाराज यांचे वडिल आदरणीय शहाजीराजे व माता आदरणीय जिजाऊ यांच्या जन्मस्थानी किमान दिवाबत्तीची व्यवस्था करण्यात यावी. स्वराज्य संकल्पक शहाजीराजे यांचे जन्मस्थान भोसले गढी वेरुळ व जिजाऊ जन्मस्थळ राजवाडा सिंदखेड राजा भग्नावस्थेत आहेत. स्थानिक लोक त्याचा हागणदारी म्हणून वापर करतात. पुरातत्त्व खात्याने दहशत निर्माण केली आहे. हे जन्मस्थाने मराठवाडा व विदर्भात आहेत. आमच्याकडे निधी खेचून आणण्याची क्षमता असणारे लोक प्रतिनिधी नाहीत. किंवा त्यांना पर्यटनाचे महत्त्व समजलेले नाही. याशिवाय संत चोखामेळा जन्मस्थान मेहूणा राजा जिल्हा बुलढाणा जिल्हा, संत नामदेव महाराज जन्मस्थान नरसी नामदेव जिल्हा हिंगोली, संत जनाबाई जन्मस्थान गंगाखेड जिल्हा परभणी, आपेगाव इत्यादी यांचीही दखल घेतली नाही. मराठा सेवा संघाच्या वतीने आम्ही अनेकदा या गोष्टीची जाणीव करून दिली आहे. तसेच गरज भासल्यास पुणे जिल्हा विस्तार करुन विदर्भ मराठवाडा खानदेश त्यात समाविष्ट करण्यात यावे अशी मागणी व विनंती केली आहे...

गंभीरपणे विचार करून योग्य निर्णय घ्यावा ही विनंती आहे ..

तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक अरबी समुद्रात होणे शक्य नाही. तेंव्हा तेच स्मारक मराठवाडा व विदर्भाच्या सिमेवर जमीनीवर बांधावे अशी विनंती आहे. महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून जागतिक पातळीवर अभिमानास्पद असे एक सांस्कृतिक अस्मितेचे प्रतिक--- "बंजारा विरासत संग्रहालय पोहरादेवी ता मानोरा जिल्हा वाशिम" येथे निर्माण करण्यात आले आहे. तोच आदर्श समोर ठेवून पाचशे एकर जमीन संपादन करुन छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय स्मारक उभे करावे .

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त खूप खूप अभिनंदन.

-पुरुषोत्तम खेडेकर चिखली.

## संपूर्ण जबाबदारी घेण्यास तयार

"संपूर्ण जबाबदारी घेण्यास तयार"; छत्रपतींबद्दल अभिनेत्याने केलेल्या विधानानंतर संभाजीराजेंचा सरकारला सल्ला राहुल सोलापूरकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल केलेल्या वक्तव्यानंतर मोठा वाद निर्माण झाला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आग्र्याहून सुटकेचा प्रसंग सांगताना राहुल सोलापूरकर याने धक्कादायक दावा केला होता. आग्र्याहून सुटकेसाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी औरंगजेबाच्या अनेक सरदारांना लाच देऊन सुटका करुन घेतली असं विधान राहुल सोलापूरकर यांनी केले होते. त्यानंतर त्यांच्या विरोधात शिवप्रेमींकडून आंदोलन करण्यात आलं. भाजपचे खासदार उदयनराजे भोसले यांनी राहुल सोलापूरकरने अतिशय विकृत विधान केले असून त्याची जीभ हासडली पाहिजे असं म्हटलं. त्यानंतर आता संभाजीराजे छत्रपती यांनी राज्य सरकारला सल्ला दिला आहे. अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी एका पॉडकास्टमध्ये बोलताना छत्रपती शिवाजी महाराजांबाबत वादग्रस्त विधान केले होते. खूप मोठ्या टीके नंतरही राहुल सोलापूरकरने पुन्हा अवमानकारक दिलगिरी व्यक्त करत माफी मागितली. महापुरूषांची बदनामी करणाऱ्यांवर देशद्रोहाच्या कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी उदयनराजे भोसले यांनी केली आहे. दुसरीकडे, संभाजीराजे छत्रपती यांनी सरकारने छत्रपती शिवाजी महाराजांच्या समग्र इतिहासावर परिपूर्ण शासकीय ग्रंथ प्रकाशित करावा अशी मागणी केली आहे. "हल्ली कुणीही उठून आपापल्या आकलनानुसार छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास मनाला वाटेल तसा सांगत आहे. इतिहासाची प्रतारणा होईल, लोकभावनेस ठेच लागेल, कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होतील, याचे कुणालाही भान राहिलेले नाही. यावर ठोस उपाय म्हणून महाराष्ट्र शासनाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या समग्र इतिहासावर परिपूर्ण शासकीय ग्रंथ प्रकाशित करावा. शासनाने शिवचरित्राचे संशोधक, अभ्यासक व चिकित्सक यांची संशोधन समिती स्थापन करून भक्कम संदर्भांवर आधारित शासकीय चरित्रग्रंथ प्रकाशित करावा, जेणेकरून शिवचरित्रावरील व्याख्याने, मालिका, नाटक, चित्रपट आदी सर्व साहित्यांस हा शासकीय चरित्रग्रंथ संदर्भ म्हणून वापरता येईल आणि इतिहासाविषयी वादंग उठणार नाही. याविषयी शासनाने तत्काळ कार्यवाही करावी. मी या चरित्र ग्रंथाच्या निर्मितीची संपूर्ण जबाबदारी घेण्यास तयार आहे," असं संभाजीराजे छत्रपती यांनी म्हटलं आहे.

पान १ वरून

## डॉ. जगदाळे जयंतीनिमित्त...

खजिनदार जयकुमार शितोळे, सहसचिव अरुण देबडवार यांच्यासह पोलीस बालाजी कुकडे, डॉ. गुलाबराव पाटील, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, डॉ. विलासराव देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

या शोभायात्रेत संस्थेच्या बाशीर्तील सर्व शाखांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला. शहराच्या मुख्य रस्त्यावरून निघालेल्या या शोभायात्रेचा पांडे चौक येथे समारोप करण्यात आला. तत्पूर्वी अनेक ठिकाणी या शोभायात्रेचे मोठ्या उत्साहाने बार्शीकरांनी स्वागत केले. ठिकठिकाणी रांगोळी रेखण्यात आली होती, तर अनेक संस्था, व्यक्ती, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते यांनी पाणी, अल्पोपहार, चहा व खाऊचे वाटप केले. या शोभायात्रेत

गरबा, लेझीम, पारंपरिक नृत्य, गीत यामुळे सर्व बार्शीकरांचे लक्ष वेधून घेतले. याचबरोबर भारतीय संविधान हातात घेऊन एकतेचा संदेश देणारे देखावे करण्यात आले होते.

नियमांचे पालन करत या शोभायात्रेत कोणत्याही प्रकारच्या डीजेचा आवाज घुमला नाही.

याउलट पारंपरिक वाद्यांचा ताल नि सूर यावरच मुलांनी आपली नृत्य सादर केले.

# हिमालयाची सावली; त्यागमूर्ती माता रमाई

आज ७ फेब्रुवारी, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची जयंती. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे ( वलंगकर ) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने



हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# सर सलामत तो पगडी पचास !

असं म्हणतात काळ कोणासाठीही थांबत नाही... बालक, तरुण,प्रौढ, वृद्ध या अवस्थातून माणूस जात असतो. कोणीच चीर तरुण, चीर प्रौढ किंवा चीर बालक राहू शकत नाही.या प्रत्येक अवस्थेत शरीराबाहेर तसेच शरीरांतर्गत अनेक बदल होत असतात. त्वचा, केस, डोळे आणि शरीर रचना मधील बदल पटकन दिसून येतात. पण शरीराच्या आतील भागात किंवा अंतर इंद्रियामध्ये होणारे बदल उघड्या डोळ्याने दिसत नाहीत.खरंतर वय जसं जसं वाढत जाईल,तसतसं आपण आपल्या शरीर स्वास्थ्याची विशेष काळजी घेतली पाहिजे. पण आपल्याला येथे याच्या नेमके उलटे होताना दिसते. आपल्याकडे वय वाढत जाईल तसं माणसं जास्त बेफिकीर बनत जातात. बदलत्या जीवनशैलीने आज माणसाच्या स्वास्थ्यावर फार मोठा आघात केला असतानाच त्याचे हे बेफिकीर वागणं अनेक आजारांना आमंत्रण देणारे ठरतं. कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पडण्याच्या वयामध्ये म्हणजेच वयाच्या चाळीसी ते साठीच्या दरम्यान एखाद्यावर जर मृत्यू ओढावला तर त्याच्या कुटुंबाची फार मोठ्या प्रमाणात वाताहात होते. आज मधुमेह सारख्या आजारांची भारत राजधानी बनला आहे. प्रत्येक तीन प्रौढ व्यक्ती पैकी एक व्यक्तीला मधुमेह असल्याचे पाहायला मिळत आहे. खरंतर मधुमेह सारखा आजार रोजच्या आहार-विहारामधील शिस्त पाळण्यात टाळाटाळ केल्यामुळे होत असतो. मधुमेह, हृदयरोग,रक्तदाब यासारखे जीवनशैली संदभार्तील आजार झोप, आहार, व्यायाम, तणाव याचे योग्य व्यवस्थापन नसल्यामुळे होत आहेत.आरोग्यदायी आहार आणि नियमित शारीरिक कसरती, व्यायाम केल्यामुळे मधुमेह, हृदयरोग आणि उच्च रक्तदाबाची समस्या ८० टक्क्यांनी कमी होते. आहाराच्या वेळा, खाण्याचे प्रमाण व पदार्थ याबाबत बऱ्याच प्रमाणात लोकांमध्ये आज जागरूकता आली आहे ; परंतु याचे प्रत्यक्ष कृतीत रूपांतर झालेले दिसत नाही. जगभरात आज कुपोषणाने होणारे मृत्यू हे चुकीच्या खाण्यामुळे व अति खाण्यामुळे जास्त होत आहेत. आपली संस्कृती मध्ये सण उत्सवांची फार मोठी रेल चेल असते. यामुळे मोठ्या प्रमाणात गोडधोड, मसालेदार आणि मांसाहारी पदार्थ खाल्ले जातात. आपल्या येथील आग्रह करून वाढण्याच्या पद्धतीमुळे लोक आवश्यक कॅलरी पेक्षा जास्त कॅलरीज आहारातून घेतात. चमचमीत पदार्थ, फास्ट फूड आणि बेकरीच्या पदार्थामुळे शरीर स्वास्थ्यावर वाईट परिणाम होतो हे आज प्रत्येकाला समजले आहे; परंतु हे पदार्थ टाळणे अनेकांना शक्य होत नाही.

आज भारतीय लोकांमध्ये व्यायाम करण्याचे प्रमाण खूप कमी असल्याचे अनेक आंतरराष्ट्रीय सर्वे मधून दाखवले गेले आहे. जिमचे सदस्यत्व घेण्याचे प्रमाण आपल्या भारतात इतर प्रगत देशांच्या मानाने खूपच कमी आहे. बैठी जीवनशैली असणाऱ्या व्यक्तींनी दररोज कमीत कमी ३० ते ४५ मिनिटे व्यायाम केलाच पाहिजे. अर्थात हा व्यायाम चालणे,धावणे यासह इतर कोणताही हृदय फुफुस यासारख्या अवयवांची कार्यक्षमता वाढवणारा असावा. व्यायामामुळे आपल्या शारीरिक नव्हे तर मानसिक आरोग्यावर देखील परिणाम होत असतो. व्यायामामुळे सकारात्मकता वाढीस लागते. ताण तणाव कमी होतो ; आणि उत्साह वाढतो.व्यायाम ही दीघार्युष्याची गुरुकिल्ली आहे हे आज प्रत्येकाने ध्यानात घेतले पाहिजे. व्यायाम आणि संतुलित आहार या दोन्हीच्या जोरावर आपण दहा ते वीस वर्षे आयुष्य वाढवू शकतो.

चांगली झोप होणे किंवा न होणे हे देखील आपल्या आरोग्यावर प्रभाव टाकत असतं . प्रौढ व्यक्तीसाठी कमीत कमी सात तास झोप आवश्यक आहे,असं वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ लोकांचं म्हणणे आहे. कारण गाढ झोपेतच नवीन पेशींची निर्मिती आपल्या शरीरात होत असते. आज नाईट लाईफ किंवा मोबाईलच्या रात्रभर केल्या जाणाऱ्या वापरामुळे आपली झोप कमी झाली आहे. परंतु जाणीवपूर्वक आपल्या जीवनशैलीत बदल करून अथवा वैद्यकीय सल्ला घेऊन झोपेच्या गुणवत्तेत सुधारणा केली पाहिजे.

आज आपल्या अपेक्षा वाढल्या आहेत पण तरीसुद्धा एका जीवनात आपण मर्यादित यश,कीर्ती, पैसा मिळवू शकतो हे ध्यानात घेतलं पाहिजे. जास्त ओढाताण करून शारीरिक,मानसिक नुकसान करून घेण्यामुळे आपले आयुष्य कमी होणार आहे. वेळच्यावेळी नियोजनपूर्वक दैनंदिन कामे आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या जर आपण पार पाडत गेलो तर तनाव आपल्याला येणार नाही. आपण एखादं महागडं वाहन विकत घेतो तेव्हा त्याचं सर्व्हिसिंग, देखभाल अगदी डोळ्यात तेल घालून करतो, तशी या टॅक्स-फ्री संपत्तीची म्हणजेच शरीराची देखील देखभाल आपण केली पाहिजे.

शेवटी आपल्या शरीराची, मनाची काळजी करायला कोणी दुसरा येणार नाही. शरीर आणि मनाची देखभाल आपल्या स्वतःलाच करावी लागणार आहे. त्यासाठी आपले छंद,आवड यांना प्राधान्य देत,मित्र मंडळी आणि नातेवाईक यांना पुरेसा वेळ देऊन हसत खेळत हे काम केलं पाहिजे. कारण ' सर सलामत तो पगडी पचास ' असं जाणकारांनी सांगूनच ठेवलं आहे. त्याप्रमाणे शरीर आणि मानसिक स्वास्थ्य जर आपण राखू शकलो, तरच अनेक गोष्टी आपण साध्य करू शकू.



**- किशोर जाधव,** सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

प्रबोधन

# थोर राष्ट्रपुरुष : महात्मा गांधी !

महात्मा गांधीजी यांचे निंदक खूप आहेत. कुणी गांधीवादी सापडला, की त्याच्यावर तुटून पडण्याचा पराक्रम ही माणसं करीत असतात. खेड्यापाड्यांतील अक्षरओळख असणाऱ्यांपासून ते दिल्ली-मुंबईसारख्या बहुभाषी, बहुजिनसी शहरांतील इंग्रजी पेपर वाचण्याचा पराक्रम करणाऱ्या देशी साहेबांपर्यंत असे बरेच गांधीशत्रू आढळून येतात. त्यांचं एक पालुपद नेहमी ऐकू येतं. ह्यागांधीजींनी या देशाचं फार नुकसान केलं! तपशील सांगा म्हटलं तर त्यातील निम्मे शत्रू गार होतात. राहिलेले सांगतात, 'त्यांनी पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये दिले.' ते का दिले? असं विचारल्यास त्यांना ते माहीत नसल्यामुळे गप्प राहावं लागतं. एक गोष्ट खरी आहे की, समाजाच्या मेंदूत जहाल-धर्म रसायन ओतण्याचं काम जे न कंटाळता करीत असतात, त्यांच्यामुळे आज खेडवळ माणूससुद्धा 'गांधी- नेहरूंनी देशाचं वाटोळं केलं,' असं सहजच म्हणताना दिसतो. आपल्या गावाच्या बाहेरचं जग केवढं आहे, हेही त्याला माहीत नसतं. पण गांधीजींवर तोंड सोडण्याचा पराक्रम मात्र ही माणसं करतात.

इथे गलिव्हर्स ट्रॅव्हल्सची कथा आठवते. गलिव्हर लिलिपुटमध्ये जातो. एक इंचाहूनही उंचीने कमी असणारे लिलिपुटवासी आकाशाएवढा गलिव्हर बघून त्यांचा उपहास करतात. बाहुल्यांच्या जगी, जाता गलिव्हर ।विनोदाला पूर येत असे असा शेरा कुसुमाग्रजांनी लिहून थोरांची थट्टा करणाऱ्यांची मनोवृत्ती व्यक्त केली आहे.

गांधी हा टीकेचा विषय करणाऱ्यांनी आणखी एक गोष्ट लक्षात घ्यावी की, गांधीजींनी भारताच्या सीमा कधीच ओलांडल्या आहेत. गौतम बुद्ध हे जसे विश्ववंद्य झाले, तसे गांधीजी हे आज जगाचे श्रद्धास्थान झाले आहेत. इंग्लंडचे तारणहार विन्स्टन चर्चिल यांनी गोलमेज परिषदेला आखूड धोतर आणि पंचा नेसलेले महात्मा गांधी पाहून त्यांची नंगा फकीर अशी संभावना केली होती. पण आज या नंग्या फकिराचं जीवन जगभरच्या समाजशास्त्रज्ञांच्या दृष्टीने, मानवजातीला उपकारक तत्त्वज्ञान झालं आहे. भारतात कुठेही चर्चिलचा पुतळा बसवण्यात आलेला नाही. पण गांधीजींचे पुतळे इंग्लंडसह जगभर उभारले जात आहेत. ही कमाई स्वतः गांधीजींचीच आहे. अमेरिकेचा निग्रो पुढारी - मार्टिन ल्यूथर किंगने गांधीजींचाच सत्याग्रह, असहकार या मागार्चा प्रयोग करून आपल्या लोकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आणि गांधीजींप्रमाणे हौतात्म्यही पत्करलं.

जग आज अनेक वादग्रस्त प्रश्नांनी त्रस्त आहे. वर्णभेद, वंशभेद हे त्वचारोगसदृश विकार तर जगाला जडलेलेच आहेत; पण त्यापेक्षा जागतिक सत्तास्थानांवर अमेरिकेसारखी राष्ट्रं कब्जा मिळवून युरोपच्या सहाय्याने तिसऱ्या जगाचं प्रचंड शोषण करीत आहेत. इराकवरील अमेरिकेचा अत्याचार; मुस्लीम अतिरेक्यांच्या हिंस्त्र, रक्तपिपासू कारवाया आणि गोध्रा- गुजरात हत्याकांड या सर्व घटनांचा एकत्रित विचार केल्यास गांधीवादी तत्त्वज्ञानाचा स्वीकार केल्याशिवाय जगातील मानवजातीला सुख-शांती लाभणारच नाही, असं ठामपणे म्हणता येईल. म्हणूनच जेव्हा समाजाचं बौद्धिक, भावनिक नेतृत्व करणारी शहाणीसुर्ती माणसं सांप्रदायिकतेचे बळी होऊन काही बोलू-लिंहू लागतात, तेव्हा खेदही वाटतो आणि त्यांच्या कोत्या बुद्धीची चीडही येते. लिलिपुटच्या लोकांच्या मानसिक क्षुद्रतेविषयी खेद व्यक्त करणाऱ्या कुसुमाग्रजांनीही पुतळे कविता लिहून गांधीजींच्या मोठेपणाला अत्यंत क्षुद्र मोजपट्टी लावून आपला लिलिपुटी स्वभावही व्यक्त केला आहे. कवितेचा भावार्थ पुढील प्रमाणे- 'मध्यरात्रीनंतर लो. टिळक, म.फुले, छ. शिवाजी महाराज व म.गांधीजी यांचे पुतळे एकत्र बसून खेद करतात. टिळक म्हणतात, 'मी फक्त चित्पावन ब्राह्मणांचा झालो आहे,' फुले म्हणतात, 'मी माळ्यांचा!' छत्रपती शिवाजी महाराज म्हणतात, 'मी मराठ्यांचा'... तेव्हा गांधीजी दुःखाने म्हणतात, 'तुमच्यामागे निदान एकेक जमात तरी आहे. माझ्यामागे मात्र फक्त सरकारी कचेरीची भिंत आहे. '

ह्या कवितेचा आशय किती संकुचित-संप्रदायनिष्ठ आहे, हे वेगळं सांगण्याची गरज नाही. पण अशा लाखो कविता लिहूनही महात्मा गांधीजींच्या मोठेपणाला धक्का पोचणार नाही; इतके ते श्रेष्ठ आहेत. कारण-

श्रीकृष्ण मोहन । गांधीजी मोहन
थोर व्यक्ती दोन। भारताच्या ॥ १
सामान्यांचा नेता । गोकुळीचा राणा
बापूजीत खुणा । दिसती त्या ॥२
कंसाचा जुलूम। कृष्ण करी दूर
ब्रिटिशांना दूर। करी बापू ॥ ३
दुर्जनांचा नाश । दोघेही करिती
स्वातंत्र्य आणिती । सकळिका ॥४
सत्य हा ईश्वर। अहिंसा ही नीती
कृष्णाच्या पुढती। गांधी गेले ॥५
निःशस्त्र लढाई । करिती गांधीजी
जगा मानव्याची । पटे खूण ॥६
जगा नि जगू द्या। जीवन मोलाचे
ध्येय बापूजींचे। जगा लाभे ॥७
'शांतिपूर्ण क्रांती'। हाच 'सर्वोदय'
मार्ग अभिनव । दाखविला ॥८
युगपुरुषाला । भक्तीने वंदावे
पशुत्व टाकावे । माणसाने ॥९
पूर्ण पुरुष हा । याच्यासम हाचि
तुलना कोणाची । नसे त्यांना ॥१०
राष्ट्रपिता थोर । देशाचा सुपुत्र
जगाचा हा मित्र । वंदू त्यांना ॥११



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# सहायक पोलिस उपनिरीक्षकावर गुन्हा दाखल

जाधव यांचे निलंबन सहायक पोलिस निरीक्षक संजय जाधव सध्या अक्कलकोट दक्षिण पोलिस स्टेशन येथे कार्यरत आहेत. संबंधित गुन्ह्यातील संशयित आरोपी सुहास साळुंखे यांना गळण्यात आल्याचे फियार्दीचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने अधीक्षकांकडे तक्रार केली. या तक्रारीनंतर सहायक पोलिस निरीक्षक संजय जाधव यांनी वरिष्ठांची खोटी सही करून नाव वगळले असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांच्यावर करमाळा पोलिसांत गुन्हा दाखल केल्यानंतर त्यांना निलंबित करण्यात आले असल्याचे सांगण्यात आले आहे.

**करमाळा (कटुसत्य वृत्त):-** उपविभागीय अधिकारी यांच्या बनावटपत्रावरून संशयित आरोपीचे गुन्ह्यामधून नाव वगळल्याप्रकरणी करमाळा पोलिस ठाण्याचे तत्कालीन सहायक पोलिस उपनिरीक्षक संजय जाधव यांच्यावर करमाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार ११ डिसेंबर २०२३ ते ३० डिसेंबर २०२३ ते सप्टेंबर २०२४ घडला आहे. करमाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

करमाळा उपविभाग उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्याकडील पत्रावरून तसेच ३० सप्टेंबर २०२४ रोजीच्या सहायक पोलिस उपनिरीक्षक संजय जाधव यांनी दिलेल्या पत्रावरून करमाळा

पोलिस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ९४६/२०२३ गुह्यांच्या तपासामध्ये तपासी अंमलदार म्हणून काम करत असताना जाधव यांनी ११ डिसेंबर २०२३ ते ३० सप्टेंबर २०२४ रोजी या लावधीमध्ये सदर गुन्ह्यातील आरोपी सुहास रामचंद्र साळुंखे हा गुन्ह्यातील घटनेवेळी घटनास्थळावर होता, अगर कसे याबाबत पुरेसा पुरावा निष्पन्न न करता पुण्यातील दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करतेवेळी आरोपी सुहास साळुंखे यांच्यावर दोषारोप न ठेवता त्यास गुह्यांच्या दोषारोपपत्रातून वगळून तपासात सहकार्य केल्याचे दिसून येत आहे. तसेच उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या बनावट सहीचे पत्र तयार करून गुन्ह्याचा दोषारोपपत्र क्रमांक घेऊन उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या पूर्वपरवानगीशिवाय न्यायालयात दाखल केले.

सदरची बाब उघडकीस आल्यानंतर सध्या अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाणे येथे कार्यरत असलेल्या सहायक पोलिस उपनिरीक्षक जाधव यांच्यावर करमाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अखेर आष्टी उपसा सिंचनचे पाणी सारोळे तलावात शेतकऱ्यांच्या ४० वर्षांच्या पाठपुराव्याला यश; आनंदाचे वातावरण

**मोहोळ (कटुसत्य वृत्त):-** आष्टी उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक दोन या योजनेद्वारे सारोळे तलावात पाणी सोडण्यात आल्याने सारोळे, खवणी व पोखरापूर या गावातील शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला. गेल्या ४० वर्षांचा शेतकऱ्यांचा संघर्ष संपुष्टात आला. दरम्यान शिंदेसेनेचे जिल्हाप्रमुख चरणराज चवरे व अन्य शेतकऱ्यांनी पाणी पडणाऱ्या वॉल्व्हचे व पाण्याचे पूजन केले.

खवणी, सारोळे, पोखरापूर या तीन गावातील शेतकऱ्यांनी आष्टी तलावातून पाणी देण्याच्या मागणीचा प्रस्ताव शासन दरबारी दाखल केला होता. मात्र, अनेक अडचणींमुळे ही योजना रखडली होती. कधी निधीअभावी तर कधी राजकीय अनास्थेमुळे, मात्र शेतकऱ्यांनी पाठपुरावा सुरूच ठेवला होता. यासाठी संघर्ष समिती ही स्थापन करण्यात आली होती. दरम्यान अनेक नेते मंडळींनी निवडणुकीच्या तोंडावर या तलावातील पाण्याचे भांडवल करून राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न केला होता. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख चरणराज चवरे यांनीही २०१८ पासून वेळोवेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्फत पाठपुरावा केला होता.

दरम्यान आष्टी तलावातून पाणी सोडण्या आले. त्यावेळी जिल्हाप्रमुख चवरे पोखरापूरचे उपसरपंच आशिष आगलावे, अण्णा शिंदे, महादेव यमगर, किरण वाघमारे, महादेव नरोटे, रमेश बारसकर, अतुल लेंगरे, राहुल लेंगरे, तानाजी सावंत आदींसह अन्य शेतकऱ्यांनी पाण्याचे पूजन केले व सारोळ्याचे ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराज की जय अशा घोषणा दिल्या.

**२० किलोमीटर अंतर**

कनिष्ठ अभियंता सतीश चवरे म्हणाले, २० किलोमीटर अंतर पार करून हे पाणी सारोळे तलावात पोचले आहे. १५ इंच व्यासाच्या पाइपमधून पाणी येत आहे. सारोळेनंतर खवणी व नंतर पोखरापूर तलावात हे पाणी सोडण्यात येणार आहे. यामुळे पंधराशे एकर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. अशोक राणा

## विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या अध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी यांची पत्रकार परिषदेत माहिती





**छत्रपती संभाजीनगर (कटुसत्य वृत्त):-** छत्रपती संभाजीनगर २१-२२-२३ फेब्रुवारी दरम्यान आयोजित १९ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी लोकसाहित्य व संस्कृतीचे अभ्यासक, इतिहास संशोधक व भाषातज्ञ डॉ. अशोक राणा (यवतमाळ) यांची एकमताने निवड करण्यात आल्याची माहिती विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या अध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी यांनी पत्रकार परिषदेत दिली. डॉ. अशोक राणा हे १८ व्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ग्रामीण साहित्यिक डॉ. वासुदेव मुलाटे यांच्याकडून सूत्रे हाती घेतील.

छत्रपती संभाजीनगर २१-२२-२३ फेब्रुवारी रोजी संविधान मूल्यांना समर्पित १९ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलन होत असून त्याच्या अध्यक्षपदी लोकसाहित्य छ. संभाजीनगर (औरंगाबाद) व संस्कृतीचे अभ्यासक, इतिहास संशोधक व भाषातज्ञ डॉ. अशोक राणा (यवतमाळ) यांची निवड सवार्नुमते करण्यात आली आहे. डॉ. अशोक राणा हे १८ व्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ग्रामीण साहित्यिक डॉ. वासुदेव मुलाटे यांच्याकडून सूत्रे हाती घेतील. डॉ. अशोक राणा हे मराठी साहित्य, भाषा, इतिहास, लोकसंस्कृती, प्रबोधन, संत वाङमय, आधुनिक समीक्षा, चित्रकला, नाट्य अशा विविध विषयांमध्ये पारंगत संशोधक म्हणून ख्यातनाम आहेत. त्यांची संशोधन व प्रबोधनपर ७६ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

आजच्या पत्रकार परिषदेस विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे पदाधिकारी किशोर ढमाले व विद्रोही १९ वे विद्रोही साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष इंजि. सतिश चकोर, निमंत्रक धनंजय बोरडे, इंजिनीयर चंद्रशेखर शिखरे, प्राध्यापक रामप्रसाद तौर, अर्जुन बागूल, अमिन शेख व १९ कार्याध्यक्ष-खालिद अहमद, खजिनदार - के.ई.हरिदास, कार्यवाहक- भाऊसाहेब जाधव, जानंद सुरडकर, मुख्य समन्वयक प्रा. भारत सिरसाट, डॉ. वैशाली डोळस, सहकार्यवाह अंतत भवरे, सविता अभ्यंकर, डॉ. सुनिता शिंदे, कॉ. मधुकर खिल्लारे, ग.ह. राठोड, हे उपस्थित होते.

# माघी यात्रेसाठी पंढरपूर नगपालिका प्रशासन सज्ज- मुख्याधिकारी : डॉ.प्रशांत जाधव

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** माघी शुद्ध एकादशी 08 फेब्रुवारी रोजी होणार असून, या यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी परराज्यासह राज्यातील इतर जिल्ह्यातून भाविक मोठ्या प्रमाणात येतात. यात्रा कालावधीत भाविकांच्या आरोग्य सुरक्षितेच्या व स्वच्छतेच्या दृष्टीने आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपालिका प्रशासन सज्ज असल्याची माहिती मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव यांनी दिली.

पंढरपूर नगर परिषदेच्यावतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहरामध्ये येणा-या लाखो भाविकांना दर्शनासाठी जाताना किंवा मंदिर परिसर महाद्वार घाट व प्रदक्षिणा मार्गावर दिंडी घेऊन जात असताना कोणतीही अडचण येऊ नये म्हणून नगर परिषदेने अर्बन बँक ते नाथ चौक, स्वा.सावरकर पुतळा ते महाद्वार, अंबाबाई पटांगण, चंद्रभागा वाळवंट व इतर रस्त्यांवरील अतिक्रमणे काढण्यासाठी विशेष मोहिम हाती घेऊन पोलीस प्रशासनाच्या मदतीने अतिक्रमण काढण्याचे काम चालु केले आहे. तसेच शहरामध्ये येणारी वाहने मुख्य रस्त्यावर किंवा प्रदक्षिणा मार्गावर येवुन भाविकांना चालताना अडथळा अथवा त्रास होवु नये म्हणुन सर्व ठिकाणी लोखंडी बॅरिकेटिंग करण्यात येत आहेत. तसेच यात्रेच्या निमित्ताने पंढरपूर शहरामध्ये भाविकांच्या मोठ्या प्रमाणात येणा-या वाहनांची सोय व्हावी म्हणुन १३ ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

तसेच वाळवंटात येणा-या यात्रेकरुंना चालण्यासाठी व पाण्याचे टँकर, जेटिंग मशीन, आरोग्य विभागाची वाहने जाणे-येणेसाठी जुना पुल ते पुंडलिक मंदीरापर्यंत रस्त्याची आखणी करण्यात आली आहे. तसेच पुंडलिक मंदीर ते दगडी पुलापर्यंत 9 हायमास्ट दिवे, प्रत्येक घाटासमोर असलेल्या लोखंडी पोलवर 200 वॅट एलईडी दिवे लावण्यात आले असुन यात्रा कालावधीत कायमस्वरूपी लखुबाई मंदिर घाट, उद्धव घाट, कुंभार घाट व चंद्रभागा घाट चार ठिकाणी स्टेडियम वर जसे फ्लड लाईट लावले जातात तसे फ्लड लाईट चे मोठे दिवे बसविण्यात आले आहेत सदर दिव्यांचा प्रकाश संपुर्ण वाळवंटात पडत आहे. त्याचप्रमाणे यात्रेकरुंच्या सोईसाठी संपुर्ण दर्शन बारी मार्ग, ६५ एकर मध्ये १६० एलईडी दिवे व ६ हायमास्ट बसविण्यात आले आहेत. तसेच ६५ एकर भक्ती सागर मध्ये असलेल्या १२ युनिटमध्ये असलेल्या १४०० शौचालयामध्ये विजेची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अनिल नगर येथील पाण्याच्या टाकीवरुन स्वतंत्र पाईप लाईन द्वारे यात्रेकरुंना पिण्याचे पाणी मिळावे या हेतुन नदीच्या वाळवंटामध्ये ७४ नळ बसविण्यात आले आहेत तसेच भक्ती सागर येथेही पिण्याची पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे तसेच वाळवंटात, ६५ एकर व पत्राशेड दर्शनबारी येथे विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात आली असुन यात्रेपुर्वी संपुर्ण वाळवंट व सर्व घाट स्वच्छ करणेत आले असुन दररोजच्या दररोज नदीपात्र स्वच्छ राहण्याच्या दृष्टीने १०० सफाई कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच नदी पात्र, पत्राशेड दर्शनबारी, ६५ एकर, मंदिर परिसरात व शहरात आगीची दुर्घटना होवु



नये म्हणुन महत्वाच्या ठिकाणी २४ तास अग्निशमन वाहने उभी करण्यात आली आहेत. पत्रा शेड, नविन अग्निशमन केंद्र, चंद्रभागा नदी वाळवंट,65 एकर. श्री संत तुकाराम भवन येथे अग्निशमन यंत्रणा उभी करण्यात आली आहे तसेच मंदीरा भोवती आग लागल्यास अग्निशमन वाहनास त्वरीत पाणी उपलब्ध व्हावे म्हणुन मंदीराच्या दक्षिण बाजुस फायर हायड्रेट उभा केला आहे. भाविकांसाठी यात्रा कालावधीमध्ये मंदीर परिसरात दोन वेळा पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. गोपाळपुर रोड दर्शन बारी पत्रा शेडमध्ये पिण्याचे पाणी नळ कनेक्शन द्वारे उपलब्ध करुन दिले आहे. या ठिकाणी शौचालयाची व्यवस्था करण्यात आली आहे. शहरात एकुण ६५ हातपंप व मंदिर परिसरातील १२ विद्युत पंपाद्वारे यात्रेकरुंना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे. तसेच यात्रा कालावधीत पिण्याचे पाणी किमान १० टँकर द्वारे संपुर्ण शहरात विशेषतः भक्ती सागर वाळवंट पालखी तळ पत्राशेड ज्या ठिकाणी मठांची संख्या जास्त आहे त्याठिकाणी पाणी पुरविण्यात येणार आहे.

यात्रा कालावधीत पुर्वी शहरामध्ये विशेष स्वच्छता मोहिम राबविण्यात आली असुन यात्रा कालावधीमध्ये शहरात स्वच्छता रहावी म्हणुन नियोजन बद्ध कार्यक्रम आखण्यात आला आहे. नगरपरिषदेच्यावतीने ७०० सफाई कर्मचा-यांद्वारे शहरात व उपनगरात स्वच्छता करण्यात येत आहे. तसेच यात्रा कालावधीमध्ये शहर, वाळवंट, ६५ एकर, पत्रा शेड दर्शनबारी येथे दररोजच्या दररोज स्वच्छता करण्यात येणार आहे. प्रत्येक मोठ्या मठांमध्ये स्वतंत्ररित्या कचरा साठविण्यासाठी लेखी पत्राद्वारे सुचना देण्यात आलेल्या असुन कोणत्याही परिस्थितीत कचरा बाहेर टाकु नये सर्व कचरा घंटागाडी कडे द्यावा म्हणुन कळविण्यात आले आहे. तसेच ४१ घंटागाडी द्वारेही कचरा गोळा करण्याचे काम यात्रा कालावधीत अहोरात्र चालु राहणार आहे. शहरामध्ये कचरा त्वरीत उचलण्यासाठी आरोग्य विभागाकडील ४ टिपर, २ कॉम्पॅक्टर, १ डंपरप्लेसर, ४ डंपिंग ट्रॉलिने व जेसीबीच्या सहाय्याने दररोज ५० ते ६० टन कचरा उचलण्याचे नियोजन केले आहे. नदीपात्र, ६५ एकर, पत्राशेड दर्शन बारी व शहरात गर्दीच्या ठिकाणी ५०० पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे उभारण्यात आली आहेत. तसेच नागरी हिवताप विभागामार्फत शहरामध्ये डेंगु अथवा इतर आजाराचा प्रादुर्भाव होवु नये म्हणुन विशेष मोहिम हाती घेतली असुन कंटेनर सर्व्हे, औषध फवारणी व फॉगिंग मशीन द्वारे धुर फवारणी करण्यात येत आहे.

बायोकल्चर तंत्राचा वापर करुन जैविक पद्धतीचे बायो कल्चर नदीच्या पात्रात होणारी घाण दुगंर्धीयुक्त वास कचरा व घाण नष्ट करणेचे दृष्टीने फवारणी करण्यात येत आहे. शौचालय नियोजनामध्ये तिर्थक्षेत्र विकास आराखड्याअंतर्गत व सुलभ शौचालयाची २९ ठिकाणीं २०५४ सीट्स, नगरपरिषदेची कायमची २५ ठिकाणी १७६ सीट्स, ६५ एकर परिसरातील कायम स्वरुपी १२ ठिकाणी १८६४ सीट्स, प्री फॅब्रिकेटेड (नदी वाळवंट, ६५ एकर, पत्राशेड दर्शनबारी, शहरात विविध ठिकाणी) असे एकुण 14 ठिकाणी 400सीट्स असे शौचालयाचे नियोजन करण्यात आले आहे.तसेच नदीपात्राचे कडेवर महिलांना अंघोळी नंतर कपडे बदलणे करिता चेंजींग रूमची व्यवस्था करणेत आली आहे. तसेच यात्रा कालावधीत मोकाट जनावरे पकडुन त्यांना नगरपरिषदेच्या कोंडवाड्यामध्ये कोंडण्यात येत आहेत.

शहरात यात्रा कालावधीमध्ये पंढरपूर नगरपरिषदेच्यावतीने, उपजिल्हा रुग्णालय व तालुका आरोग्य अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने वतीने, पत्राशेड, दर्शनबारी, पोलीस संकुल, दर्शन मंडप, ६५ एकर, चंद्रभागा वाळवंटात वेदांत भक्त निवास, नागरी आरोग्य केंद्र काळा मारुती व सारडा भवन, श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात यात्रेकरुंच्या सोईसाठी प्रथमोपचार केंद्र उघडण्यात आले आहेत. तसेच यात्रा कालाधीमध्ये संपुर्ण यात्रेवर नियंत्रण ठेवण्यासाठी, ६५ एकर भक्ती सागर, नदी वाळवंट, गोपाळपुर रोड दर्शन बारी पत्रा शेड, पंढरपूर नगरपरिषद मुख्य कार्यालय या ठिकाणी आपातकालिन व्यवस्थापन केंद्राची (EOC) स्थापना केलेली आहे.

यात्रा व्यवस्थित पार पडावी म्हणुन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, उपविभागीय अधिकारी तथा प्रशासक सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली, मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव, उपमुख्याधिकारी अँड. सुनिल वाळुजकर, प्रशासकीय अधिकारी रवींद्र सूर्यवंशी, नगरअभियंता नेताजी पवार,उप अभियंता प्रकाश केसकर, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे व नागनाथ तोडकर, पाणीपुरवठा अभियंता राजकुमार काळे, सुहास झिंगे, सोमेश धट, ऋषिकेश गड्डम, कर अधिकारी सुप्रिया शिंदे, जनसंपर्क अधिकारी सुवर्णा हाके, मुख्य लेखापाल करुणा शेळके, अंतर्गत लेखापरीक्षक प्रशांत पवार, खरेदी पर्यवेक्षक विजय शहाणे,रोडलाईट इन्स्पेक्टर संतोष क्षिरसागर, आरोग्य निरीक्षक नाना गोरे, अग्निशमन अधिकारी संभाजी कार्ले, हिवताप अधिकारी शुभांगी अधटराव, सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी प्रयत्नशील आहेत. तसेच यात्रा कालावधीमध्ये शहरातील सर्व स्थानिक नागरीकांनी स्वच्छता व आरोग्य सुव्यवस्थीत राहण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी डॉ प्रशांत जाधव यांनी केले आहे.

तसेच पंढरपूर शहरामध्ये नगर परिषदेच्या वतीने केलेल्या विविध कामाची पाहणी प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, मुख्याधिकारी डॉ प्रशांत जाधव, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, उपमुख्याधिकारी अँड. सुनील वाळूजकर व प्रमुख अधिकारी यांच्या समवेत पाहणी केली.

# नेताजी शिक्षण संस्थेत श्री वीरतपस्वी पुण्यतिथी साजरी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संस्थेत श्री बृहन्मठ होटगी मठाचे परमपूज्य गुरुवर्य श्री ष. ब्र. श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी यांची ६९ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या हस्ते वीरतपस्वींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी महामंगल आरती करण्यात आली.यावेळी मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार,पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे आदी उपस्थित होते.पूर्वा रेके या विद्यार्थ्यानीने पूज्य महास्वामीजींच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितले.यावेळी विश्वाराध्य मठपती म्हणाले, स्वातंत्र्यपूर्व काळात अशिक्षितपणा व अज्ञानाने गुरफटलेल्या समाजाला आपल्या अमोघ वक्तृत्व शैलीतून महास्वामीजी प्रबोधन करित होते .विज्ञाननिष्ठ महास्वामीजींनी कित्येक ठिकाणी लोकांना पशुहत्तेपासून परावृत्त केले. मुख्याध्यापक रविशंकर कुंभार म्हणाले, महास्वामीजी वयाच्या



पंधराव्या वषार्पासून श्रावणमास शिवलिंग तपोनुष्ठानास सुरुवात केली. जीवनातील दुःख निवारण करण्यासाठी नेहमी शिवचिंतन, ध्यान, योग, मेडिटेशन काळाची गरज असल्याचे सांगत.त्यांच्या चेहऱ्यावर तपस्येचे तेज अफाट होते. प्रत्यक्ष ईश्वराचे दर्शन घेतल्याचा साक्षात्कार भक्तांना होत असल्याचे सांगताना संगदरी, दर्गनहळ्ळी व धोत्री येथील भक्तांना महास्वामीजींचा साक्षात्कार कसा झाला याचे वर्णन पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे यांनी केले.यावेळी विठ्ठल कुंभार, शिवानंद पुजारी, विनायक कोरे, भारती पाटील यांच्यासह प्राथमिक मराठी, इंग्लिश मिडीयम स्कूल, माध्यमिक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रशालेतील १२०० विद्यार्थ्यांना प्रसाद वाटप करण्यात आला.

**राजराजेश्वरी शिक्षण संकुल**

विनायक नगर येथील राजराजेश्वरी शिक्षण संकुलात शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली कुंभार व माध्यमिक प्रशालेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे यांच्या हस्ते श्री वीरतपस्वींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी महामंगल आरती करण्यात आली.

मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे म्हणाले, श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी हे महान तपस्वी व योगी होते. त्यांचे धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक कार्य प्रेरणादायी आहे. मानव धर्माच्या कल्याणसाठी व विश्वाला शांती मिळण्यासाठी महापूजेच्या माध्यमातून तीस अनुष्ठान केले. गोरगरीब भक्तांच्या मुलांसाठी शिक्षणाची सोय व्हावी म्हणून सोलापुरात श्री मद्वीरशैव गुरुकुल व श्री सिद्धलिंग आश्रम स्थापन केले. त्यांच्या कृपा आशीवार्दाने आज हजारो मुले वेगवेगळ्या क्षेत्रात नाव लौकीक करित आहेत. मुख्याध्यापिका वैशाली कुंभार म्हणाले ,पूज्य महास्वामीजींनी अनेक खेडोपाडी जाऊन अनुष्ठान केले. प्रवचनाच्या माध्यमातून समाजाला प्रबोधन केले. भक्तगणांत असलेली अंधश्रद्धा,अंध विश्वास नाहिसे केले. स्वतः दहा -पंधरा नाटक लिहून नाटकाच्या माध्यमातून मुलांना शिक्षणासाठी प्रवृत्त केले.म्हणून त्यांच्या कृपा आशीवार्दाने आज हजारो गावे संस्कारीत झाले व गावातील मुले सुशिक्षित झाल्याचे सांगितले. यावेळी शाळेतील १४०० विद्यार्थ्यांना प्रसाद वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी वृंदानी परिश्रम घेतले.

# अकोले-खुर्दच्या उपसरपंचपदी जगताप

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त) :-** माढा तालुक्यातील अकोले-खुर्द ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी द्रोपदा वामन जगताप यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सरपंच रूपाली कांतीलाल नवले यांच्या अध्यक्षतेखाली निवड झाली. यावेळी ग्रामसेवक बी.ए.दास यांनी ही निवड जाहीर



केली. निवड झाल्यानंतर सरपंच रुपाली नवले यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.अकोले-खुर्द ग्रामपंचायतमध्ये पाच वर्षात पाच सदस्यांना उपसरपंचपदी संधी देण्यात आली. यावेळी विकास सेवा सोसायटीचे चेअरमन हरिदास पाटील, राष्ट्रवादी युवकचे तालुकाध्यक्ष संभाजी पाटील, संतोष पाटील, दीपक पाटील, रमेश पाटील, महादेव घाडगे, अनिल तोडकर, सचिन पाटील, सुधाकर नवले, प्रताप चिंतामण, भारत नवले, प्रकाश घाडगे, नागेश पाटील, कुबेर महाडिक, रणजीत पाटील, अनिल तोडकर, गजानन तोडकर, तानाजी जगताप,सागर महाडिक, सिद्धेश्वर जगताप, सतीश लिंगे, तानाजी मासुळे, महादेव मासुळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# शिकाऊ उमेदवारी भरती 10 फेब्रुवारीला मेळावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड, सोलापूर येथे दि. 10 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळी 10.00 वाजता आय. टी.आय. उत्तीर्ण, 12 वी उत्तीर्ण, डिप्लोमा व पदवीधर उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांसाठी प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती (PMNAM) मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या आदेशानुसार जिल्यामामध्ये प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती (PMNAM) मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, जिल्ह्यातील सर्व आस्थापना व पात्र प्रशिक्षणार्थी यांनी मेळाव्यास उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, द्वारा महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार एस.आर.भालचिम यांनी केले आहे.

## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्क्रिझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**हुरडा पार्टी**
**शालेय सहल व हुरडा पार्टी**
आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांदुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.
मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११

# ओबीसी महामंडळाची थकीत व्याज दरात सवलत योजना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** ओबीसी महामंडळाच्या थकित कर्ज प्रकरणात संपूर्ण थकित कर्ज रक्कमेचा एक रकमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यास थकित व्याज रक्कमेत (५०% सुट) सवलत देण्याबाबतची एकरक्कमी परतावा (OTS) योजना दि.३१ मार्च २०२५ पर्यंत राबविण्यात येत आहे त्यानुसार, महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थ्यांनी योजनेचा फायदा घेऊन कर्ज मुक्त व्हावे,असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक श्रीमती व्ही.डी. लहारे यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत विविध कर्ज योजनेतंर्गत जिल्ह्यातील इतर मागास प्रर्वगातील लाभार्थ्यांना स्वयंरोजगारकरीता अल्प व्याजदराने कर्ज वितरीत केले आहे. जिल्ह्यातील वाटप झालेल्या थकीत लाभार्थ्यांना महामंडळाकडून थकीत व्याज दरात (५०% सुट) सवलत दि.३१ मार्च २०२५ पर्यंत देण्यात येणार आहे. या एक रक्कमी परतावा योजनेचा लाभ घेऊन सर्व संबंधित लाभार्थ्यांनी कर्जमुक्त व्हावे. अधिक माहितीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा मजला, सात रस्ता, सोलापूर जिल्हा कार्यालयाशी (दुरध्वनी क्रमांक ०२१७-२३१२५९५) संबंधितांनी संपर्क साधावा असे आवाहनही जिल्हा व्यवस्थापक श्रीमती व्ही.डी. लहारे यांनी केलेले आहे.

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्अॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) विचार विनिमय, सल्ला **** २) फुलांची माला, पराभव ३) धान्याचा ढीग ४) एक म्हण-**** *** गुडघ्याला बाशिंग ५) सैन्याला पुरविला जाणारा दाणागोटा ६) आ. बच्चू कडू यांची संघटना ७) नगर, सिटी ९) महिना १२) पानाचा विडा रंगण्यासाठी त्यामध्ये हा वापरतात १४) सहा गुणिले दोन १६) एक म्हण-उथळ पाण्याला खळखळाट ** १७) कॉलनी (मराठीत) १८) ख्रिश्चन धर्मियांचा एक सण, ख्रिसमस २१) दुर्लक्ष, आबाळ २२) पती २३) अभिनेत्री असलेली रमेश देव यांची पत्नी २६) लगेच, तात्काळ २७) चांगलाच्या विरूध्दार्थी २९) पूर्वी बांधले जाणारे चिरेबंदी चौसोपी निवासस्थान ३०) गाईचे पिल्लू ३१) उंचावरून पडणारा पाण्याचा प्रवाह ३२) स्वर्गच्या विरूध्दार्थी ३४) भित्रा, घाबरट ३५) एक दाक्षिणात्य अभिनेता-*** हसन ३८) उष्ण, तप्त ३९) भरावासाठी वापरले जाणारे दगड, मुरूम इत्यादी ४१) चिंतन ४३) भिंतीवरील सरपटणारा प्राणी ४५) सल उलट लिहा

**आडवे शब्द :** १) आपले राज्य ४) सर्वाधिक खासदार या राज्यातून निवडले जातात ८) श्रेष्ठ, वरचढ ९) आई १०) तीन दुणे ११) एक शिवकालीन घोषणा- ** हर महादेव १२) ससा आणि याची शर्यतीची गोष्ट प्रसिध्द आहे १३) राजाचा सभामंडप १५) दोहोंतील अंतर, भेद १९) पृथ्वी, पातळ कालवण २०) भारताचे यापूर्वीचे पंतप्रधान-***** सिंह २३) श्रीरामाची पत्नी २४) बसपाचे निवडणूक चिन्ह २५) महाराष्ट्रातील या जिल्ह्याच्या नावामध्ये काना, माला, वेलांटी काही नाही २६) भाकरी थापण्याचे गोलाकार पात्र २७) वायू, पवन २८) शिरा २९) पाचगणीला जाताना या शहरातून जावे लागते, सातारा जिल्ह्यातील या ठिकाणचे महागणपतीचे मंदिर प्रसिध्द आहे ३०) इंग्रजी मुळाक्षरातील शेवटून दुसरे अक्षर ३१) एक भारतीय फलंदाज-शिखर *** ३३) आकाशातील विजांचा चमकताना होणारा आवाज ३६) सर्व (हिंदीत) ३७) कडक नसलेले, मऊ ३८) आकाशात उंच भरारी घेणारा पक्षी ४०) हिंमत ४२) खांब ४३) पलीकडे, पल्याड ४४) ताकदवान ४६) पाच वजा चार ४७) जखमेवर लावतात तो ४८) रूची, आवड, फळातील द्रव ४९) पाच आणि चार मिळून होणारी संख्या

## सुडोकु - 170

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | | 3 | 2 | | | 1 | | |
| | | 6 | | | 7 | 8 | | 2 |
| 1 | | | 3 | | | 7 | | 5 |
| 3 | 5 | 1 | | | 2 | | 8 | 4 |
| | | 7 | | 4 | | 6 | 1 | |
| 4 | 6 | | 8 | | 1 | | | |
| | | | | | 8 | 5 | 6 | 1 |
| | | 2 | 4 | 1 | 5 | | 7 | |
| 8 | | 5 | | 6 | | | | |

# हंडे यांनी शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून केलेली शैक्षणिक सेवा आदर्शवत - देशमुख

**माढा (कटूसत्य वृत्त):-** शिक्षण विस्तार अधिकारी शोभा पांडुरंग हंडे यांनी शिक्षक पदापासून आपल्या शैक्षणिक सेवेची सुरूवात करून मुख्याध्यापक ते शिक्षण विस्तार अधिकारी पदापर्यंत केलेली शैक्षणिक सेवा आदर्शवत असल्याचे माढा तालुक्याचे नेते रावसाहेब नाना देशमुख यांनी सांगितले.

पंचायत समिती कुडूर्वाडीच्या शिक्षण विस्तार अधिकारी शोभा हंडे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त सेवापुर्ती सन्मान सोहळ्याचे आयोजन कुडूर्वाडीतील कुबेर मंगल कार्यालयात आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी रावसाहेब नाना देशमुख बोलत होते. पुढे बोलताना देशमुख म्हणाले की,शोभा हंडे यांनी आपल्या शैक्षणिक सेवेत शिक्षक म्हणून अनेक विद्यार्थी घडविले ते आज उच्चपदस्थ आहेत. मुख्याध्यापक व शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून उत्तम रीतीने प्रशासन चालविले व आपले कुटुंबही घडविले त्यांची मुलगा- सुन डॉक्टर,तर मुली- जावई अधिकारी आहेत.त्यांनी एक संस्कारी, आदर्शवत कुटुंब घडविले. समाजाने त्यांचा आदर्श घेण्यासारखा आहे. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार विनायकराव पाटील, माढा तालुक्याचे नेते रावसाहेब नाना देशमुख, पंचायत समितीचे माजी सदस्य तथा विठ्ठलगंगा फार्मर कंपनीचे संस्थापक-अध्यक्ष धनराज शिंदे, गटशिक्षणाधिकारी विकास यादव, भ. क. ल वालावलकर वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.मानसिंगराव घाटगे, माजी विस्तार अधिकारी ॲड. भगवानराव पाटील, मधुकरराव लोंढे-पाटील,ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मण कांबळे, माजी सैनिक संघटनेचे माढा तालुका सचिव मेजर अरूण जगताप, माजी सरपंच संजय लोंढे, प्रियंका आतकर डॉ.लकी दोशी, अंबुताई इतापे, चंदाराणी आतकर, सिमिंता कुंभार यांच्यासह कार्यक्रमाचे संयोजक,मराठा सेवा संघाचे माढा तालुकाध्यक्ष निलेश देशमुख उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शोभा पांडुरंग हंडे यांचा सेवापुर्ती निमित्त तुळशीहार व १००० वह्या, पुस्तके भेट देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला.यावेळी लक्ष्मण कांबळे, गटशिक्षणाधिकारी विकास यादव, माजी आमदार विनायक पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष जाधव यांनी तर सुत्रसंचालन सुधीर क्षीरसागर यांनी केले. यावेळी मराठा सेवा संघाच्या वतीने पुस्तक विक्रीचा स्टॉल लावण्यात आला होता.



### २०२१ वह्या दिल्या भेट

यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी शोभा हंडे यांचे चिरंजीव सुप्रसिद्ध रेडिओलॉजिस्ट डॉ.पंकज हंडे व कार्यक्रमाचे संयोजक मराठा सेवा संघाचे माढा तालुकाध्यक्ष निलेश देशमुख यांच्या संकल्पनेतून कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेतून शुभेच्छा देण्यासाठी येणाऱ्या मान्यवरांनी पुषगुच्छ, हार, फुले न आणता वह्या आणाव्यात असे आवाहन करण्यात आले होते. त्याला मोठा प्रतिसाद मिळाला व या कार्यक्रमात तब्बल २०२१ वह्या जमा झाल्या असून त्या तालुक्यातील गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणार असल्याचे माजी केंद्रप्रमुख पांडुरंग हंडे यांनी सांगितले.

# शिवजयंतीचे परवाने तातडीने सुरू करा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्सव काही दिवसांवर येऊन ठेपले आहे तरी पोलीस प्रशासनाच्या वतीने ऑनलाइन व ऑफलाइन उत्सव परवाना तात्काळ सुरू करावेत अशा मागणीचे निवेदन संभाजी ब्रिगेडच्या वतीने पोलीस आयुक्त एम राजकुमार यांना देण्यात आले.

यावेळी पोलीस आयुक्तांनी येत्या दहा तारखेला पोलीस आयुक्त कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे चार दिवसात पोलीस स्टेशन वाईज बैठका होणार असून उत्सव परवाना बाबत कोणतीच अडचण मंडळाला येणार नाही असे यावेळी सांगितले.



संपूर्ण महाराष्ट्रात 19 फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी होते सोलापूर शहरातील विविध मंडळाच्या वतीने शिवजन्मोत्सव मोठ्या भव्य प्रमाणात साजरा करण्यात येतो हा शिवजन्म सोहळा पाहण्यासाठी महाराष्ट्रातून नागरिक सोलापूरमध्ये येतात 14 ते 19 या कालावधीत विविध मंडळाच्या भव्य मिरवणूक निघतात सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या वतीने शांतता कमिटीचे बैठक लवकर आयोजित करण्यात यावी तसेच ऑनलाईन व ऑफलाइन परवानगी प्रक्रिया सुरू करण्यात यावी अशी मागणी निवेदनद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेड पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले शहराध्यक्ष शिरीष जगदाळे उपाध्यक्ष फिरोज सय्यद जिल्हासचिव बबन डिंगणे मल्लिकार्जुन शेवगार दिनेश वर्पे सचिन जाधव आदि उपस्थित होते.

# नातेपुते विकास आराखडा आरक्षण रद्द करण्याबाबत पालकमंत्री यांना निवेदन



**नातेपुते (कटूसत्य वृत्त) :-** नातेपुते नगरपंचायत ने नातेपुते शहराचा विकास आराखडा तयार केला आहे मात्र तो आराखडा चुकीच्या पद्धतीने झाला असल्याने सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस कार्याध्यक्ष अक्षय भांड यांनी सोलापूर जिल्हा पालकमंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन नातेपुते विकास आराखडा रद्द करण्याबाबत निवेदन दिले आहे. सदर देण्यात आलेल्या निवेदनामध्ये मांडण्यात आले आहे की, नातेपुते नगरपंचायतने नुकताच नातेपुते गावचा विकास आराखडा तयार केला आहे, त्यामध्ये नातेपुते शहरातील अनेक लोकांची घरे, शेतकऱ्यांच्या शेतजमीनी आणि व्यापारांची दुकाने याच्यावरती आरक्षण टाकण्यात आले आहे. वास्तविक पाहता नातेपुते गावातील नागरीकांना विश्वासात न घेता हा विकास आराखडा तयार केला आहे त्याची गरज आता तरी नातेपुते शहराला नाही या आराखड्यामुळे अनेक नागरीकांचे संसार उध्वस्त होत आहेत. भविष्यातील तीस वर्षाच्या विचार करून मृगजळाप्रमाणे गोरगरिबांच्या सामान्य कुटुंबांच्या जागेवर आरक्षण टाकलेले आहे पण मागील तीस वर्षापासून श्री. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी नातेपुतेचे मुक्कामी किमान वीस ते पंचवीस एकर जमिनीची मागणी राज्यातील लाखो वारकरी, आळंदी देवस्थान करीत आहे. याबाबत वेळोवेळी महसूल खात्याशी त्यांनी संपर्क साधला आहे. नातेपुते ग्रामपंचायतने याच्या अगोदर प्रत्येक वर्षी श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यासाठी सध्याच्या तळालगतची जमीन सुचविलेली आहे तसे ठराव ही झाले आहेत.

असे असताना नातेपुते नगरपंचायतीने या ग्रामस्थांच्या व आळंदी देवस्थानच्या मागणीकडे तमाम वारकऱ्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष करून माऊलीच्या पालखी सोहळ्यासाठी नियोजन आराखड्यात जागा आरक्षित केलेली नाही. पालखीतळासह पुन्हा नव्याने आरक्षण करावे व नातेपुते शहरामध्ये (विकास आराखडा) नुकतेच झालेले आरक्षण शासनाने तातडीने रद्द करावे व बाधित नागरिकांवर झालेला अन्याय दूर करावा अशा आशयाचे निवेदन सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस कार्याध्यक्ष अक्षय भांड यांनी सोलापूर जिल्हा पालकमंत्री जयकुमार गोरे यांना दिले.

# जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी क्रीडा स्पर्धांना उत्साहात सुरूवात

## खिलाडूवृत्तीने खेळा, नियमांचे पालन करा - सिईओ कुलदीप जंगम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** हातात झेंडा घेऊन एक ताल करीत परेड.. व लेझीम च्या तालात... झांज पथकाच्या निनादात जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी क्रीडा स्पर्धांना उत्साहात सुरूवात झाली.



सोलापूरातील जय जवान जय किसान सैनिक स्कूल नेहरूनगर, शासकीय मैदान नेहरूनगर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते मशाल प्रज्वलित करून सुरूवात झाली.

जि.प. क्रीडा व सांस्कृतिक नियोजन समितीचे सहप्रमुख तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप कोहिणकर, प्रकल्प संचालक एस.बी. ठोंबरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, सर्व गटविकास अधिकारी, सहसचिव. अनिल जगताप, संजय सांवत, शिक्षणाधिकारी कादर शेख, शिक्षणाधिकारी सचिन जगताप, क्रीडा विशेष निमंत्रीत सदस्य रविंद्र चव्हाण,गणेश पवार,. संतोष जाधव, सचिन जाधव, विवेक लिंगराज, अविनाश गोडसे, गिरीष जाधव यांची प्रमुख उपस्थित होती

**खिलाडूवृत्तीने खेळा, नियमांचे पालन करा - सिईओ कुलदीप जंगम**

जिल्हा परिषदे मधील अधिकारी व कर्मचारी यांच्यात स्पर्धेच्या माध्यमातून खिलाडूवृती जोपासली जावी. खेळाच्या मैदानात खिलाडू वृत्तीने खेळा. खेळाच्या नियमाचे पालन करावे. वाद मैदानाच्या बाहेर ठेवा. सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी बोलताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर म्हणाले, यांनी दोन दिवसांच्या कालावधीत खिलाडू वृत्तीने खेळा. सामुहिक व व्यक्तिगत प्रकारा मध्ये खेळाचे आयोजन करणेत आले आहे.

या प्रसंगी बोलताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, म्हणाल्या, कर्मचारी व अधिकारी यांच्या मध्ये परस्पर समन्वय, सहनशीलता, ताणतणावाचे व्यवस्थापन इत्यादी मूल्ये वाढीस लावून निखळ मनोरंजनातून आनंद घेणे या स्पधेर्चा मुख्य हेतू आहे. पंचाच्या नियमांचे पालन करा. या स्पधेर्तून पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांच्यामधील प्रशासकीय कामाचा थकवा घालवून व परस्पर सद्भावना वाढीस लागून नव्या जोमाने, नव्या उत्साहाने कार्यास लागता यावे या हेतूने या स्पधेर्चे आयोजन करणेत आले असल्याचे स्मिता पाटील यांनी सांगितले.

या स्पर्धेत सर्व विभागातील मुख्यालय व सर्व तालुक्यातून दोन हजार पेक्षा जास्त खेळाडू व कलावंत या स्पर्धेत सहभागी होणार असून याला क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे स्वरूप प्राप्त होणार आहे.या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) मा. स्मिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व समित्यांचे प्रमुख, सचिव व सदस्य तसेच क्रीडा व नियोजन समिती चे सहसचिव अनिल जगताप, सहसचिव संजय सावंत, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, किरण लोंढे,सदस्य विवेक लिंगराज, अविनाश गोडसे, झहीर शेख, नागेश पाटील, सचिन साळुंखे, नागेश धोत्रे, गिरीष जाधव, गणेश कुडले पुंडलिक कलखांबकर, शिवाजी वसपटे, शहानवाज मुल्ला, मल्लिकार्जुन सोमेश्वर, डॉ. माधुरी भोसले, नरेंद्र अकेले, इरफान कारंजे व कृष्णकांत लोवे, प्रा. राजु प्याटी आदी या क्रिडा स्पर्धा यशस्वी करणे साठी प्रयत्न करत आहेत.

**खेळाडूमध्ये चैतन्याची लहर**

कुसूर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुलांच्या लेझीम पथकाने सर्वांचे लक्ष वेधले. जय जवान व जय किसान विद्यालयाच्या एनसीसी कॅडेटस नी सिईओ कुलदीप जंगम व अतिरिक्त सिईओ संदीप कोहिणकर यांचे सह विभाग प्रमुखांनी ११ तालुक्याचे व मुख्यालयातील खेळाडू व एनसीसी कॅडेटस ची मानवंदना स्विकारली. हातात झेंडे घेऊन पथसंचलनात सहभागी झाले होते. रंगीबेरंगी टी शर्ट व पँट आकर्षक पेहराव मध्ये जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी खेळाडू म्हणून सहभागी झाले होते.

**सिईओ जंगम यांनी केले जिल्हा परिषद टीम चे कौतुक**

एखाद्या राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेस लाजवेल अशा प्रकारे या क्रिडा स्पर्धेचे आयोजन करणेत आले होते. स्पर्धेच्या उत्कृष्ठ संयजोना बद्दल जिल्हा परिषदे टीम चे कौतुक सिईओ कुलदीप जंगम यांनी केले. सुत्रसंचालन स्वागत समितीचे प्रमुख अविनाश गोडसे यांनी केले तर समितीचे सहसचिव संजय सावंत यांनी केले.

# कुलकर्णींची राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्षपदी निवड

**माढा (कटूसत्य वृत्त):-** विनंती अवधूत कुलकर्णी यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सोलापूर जिल्हा युवती राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाली. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी युवतीच्या प्रदेशाध्यक्षा सक्षणा सलगर यांच्या स्वाक्षरीचे पत्र विनंती कुलकर्णी यांना माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील व आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते देण्यात आले.



लोकसभा निवडणुकीवेळी कुलकर्णी यांना तालुका युवती अध्यक्ष करण्यात आले होते. कुलकर्णी यांनी केलेल्या कामांची दखल घेत पक्ष श्रेष्टीकडुन सोलापूर युवती जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली आहे. सोलापूर जिल्हातील ग्रामीण भागात महिलांचे संघटन करुन पक्षाचे विचार ध्येय धोरणं राबविली जाणार असुन गाव तिथे शाखा काढणार असल्याचे कुलकर्णी यांनी निवडीनंतर सांगितले. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशिल मोहिते पाटील, आमदार अभिजीत पाटील आदींनी कुलकणींचा सन्मान केला.

# ऋतुराज सावंत यांचा आदर्श उपक्रम

## अनांथाना व डोंबारी समाजातील कूटूंबाना साड्या-शिध्याचे केले वाटप

**माढा (कटूसत्य वृत्त):-** वाकावचे सरपंच ऋतुराज शिवाजीराव सावंत यांनी आदर्श उपक्रम राबविला. वडाचीवाडी येथील आधार वृध्दाश्रमातील अनांथाना तसेच मानेगाव मधील डोंबारी समाजातील कूटूंबाना साड्या व शिध्याचे वाटप करीत सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस साजरा केला.



ऋतुराज सावंत यांनी आधार वृध्दाश्रमात जाऊन तेथील वयस्कर मंडळीशी मायेने आपुलकीने हितगुज साधत शिधा वाटप करुन वृध्द महिलांना साड्याचे वाटप देखील केले.

वाढदिवस म्हटलं की हजारो रुपयांचा अनाठायी खर्च केला जातो. केक, फटाके, पाट्र्या वाढदिवसाच्या निमित्ताने हॉटेल मध्ये रंगतात.मात्र या प्रथे बरोबरच सामाजिक भान देखील जपणे तितकेच गरजेचे आहे.या उदात्त हेतुने सरपंच ऋतुराज यांनी वृध्दाश्रमा बरोबरच मानेगाव मधील डोंबारी समाजातील कुटूबियांना देखील शिधा वाटपा बरोबरच साड्या ही दिल्या.

वंचित समाजासाठी मदतीचा हात दिल्याचे फार मोठं समाधान लाभले असल्याची प्रतिक्रिया सरपंच ऋतुराज यांनी दिली.या उपक्रमाचे समाजातुन कौतुक केलं जात आहे.यावेळी शिवसेनेचे तालुका प्रमुख मुन्ना साठे,विक्रम कदम,योगेश जाधव,सम्मेद सावळे यांचेसह कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते

# महेश निचळ विशेष वसुली अधिकारी



**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढ्यातील महेश मोहन निचळ यांची दारफळ सिना ग्रामीण पतसंस्थेच्या विशेष वसुली अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिंबधक ए.ए.गावडे यांनी महेश निचळ यांना नियुक्ती पत्र दिले. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ मधील नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्जवसुली करुन वसुली करताना सहकार कायद्यातील तरतुदी व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सुचना नियुक्ती पत्रातुन निचळ यांना देण्यात आल्या आहेत.विशेष वसुली अधिकारी म्हणुन नियुक्ती झाल्याने श्री निचळ यांचे सत्कार करुन अभिनंदन केले जात आहे.

# माजी सैनिकांच्या विधवा महिलांच्या कल्याणासाठी संघटना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** जिल्हयातील सर्व माजी सैनिकांच्या विधवा महिलांच्या कल्याणासाठी संघटना स्थापित करणेबाबत सैनिक कल्याण विभागाचे संचालक यांनी सुचना दिलेल्या आहेत. माजी सैनिकांच्या विधवा महिलांसाठी जिल्हा स्तरावरील योग्य व तात्काळ कार्यवाही करुन संघटना स्थापित करावी. माजी सैनिकांच्या विधवा महिलांमध्ये माजी सैनिकांच्या विधवांसाठी देण्यात येणा-या उपाययोजना करण्यासाठी दररोज सकाळी ११.०० ते ०२.०० वाजेपर्यंत सैनिकी मुलींचे वसतिगृह, सुंदरमनगर शासकीय आय.टी.आय च्या पाठीमागे विजापूर रोड, सोलापूर येथे माजी सैनिक विधवा महिलांचे मेळाव्याचे अयोजन केले आहे. तरी जास्तीत जास्त संख्येने माजी सैनिकांच्या विधवांनी सैनिकी मुलींचे अशासकीय वसतीगृह अधिक्षिका श्रीमती आशादेवी सिध्दलिंगप्पा किवडे यांच्याशी भ्रमणध्वनीव्दारे मो.नं. ९५२७५८४०३४ वर तात्काळ संपर्क साधावा असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी कळविले आहे.

# माघी यात्रेसाठी चंद्रभागा नदीपात्रात सोडले पाणी

## वारकरी, भाविकांना चंद्रभागा नदीत करता येणार पवित्र स्नान



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त) :-** माघ शुध्द एकादशी 08 फेब्रुवारी 2025 रोजी असून, माघ यात्रा कालावधी दि. 02 ते 12 फेब्रुवारी आहे. या यात्रा कालावधीत श्री विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. वारकऱ्यांसाठी चंद्रभागेचे स्नान फार पवित्र मानले जाते.श्री विठ्ठल- रुक्मिणीमातेचे दर्शन घेण्यापुर्वी भाविक चंद्रभागा स्नान करतात. भाविकांना चंद्रभागाभागा नदी पात्रात पवित्र स्नान करता यावे. यासाठी दगडी पूला जवळील बंधाऱ्यातून 240 क्युसेक्सने पाणी सोडण्यात आले आहे.

चंद्रभागा नदीपात्रातील पाण्याची पातळी कमी झाल्याने व जास्त काळ पाणी साठून राहिल्याने पाण्यावर शेवाळे येऊन पाणी जास्त काळ साठल्याने पाणी घाण झाले होते. उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी तातडीने कार्यकारी अभियंता भीमा पाटबंधारे विभाग व पंढरपूर नगर परिषदेचे मुख्य अधिकारी यांच्याशी चर्चा करून गुरसाळे व नगर परिषदेच्या बंधारे मधून तातडीने सहा दरवाजे उघडून नदी पत्रामध्ये पाणी सोडण्याबाबत सूचना दिल्या. त्या अनुषंगाने गुरसाळे बंधाऱ्यातून व नगर परिषदेच्या बंधायामधून भाविकांचे सोयीसाठी बंधाऱ्याचे सहा दरवाजे उघडून चंद्रभागा नदीपात्रामध्ये पाणी सोडण्यात आल्याने व माघी यात्रेमध्ये भाविकांना स्नानासाठी पाणी उपलब्ध झाल्याने भाविकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे

तसेच नदीपात्रामध्ये सध्या पाण्याची रिसायकलिंग करून पाणी स्वच्छ करण्याची यंत्रणा बसवण्याचे काम सध्या प्रगतीपथावर असून, सदरची यंत्रणा आषाढी यात्रेपूर्वी कार्यान्वित करण्यात येणार असल्याची माहिती नगरपालिका प्रशासनाने दिली आहे.

# बेरोजगारांच्या सेवा पुरविणाऱ्या सहकारी संस्थांनी आपले दरपत्रक सादर करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर या कार्यालयात 6 महिन्याच्या कालावधीकरिता बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने शिपाई तसेच 11 महिन्यांसाठी सफाईगार पदाची सेवा पुरविणाऱ्या नोंदणीकृत कार्यरत बेरोजगार संस्थांकडून विनानिवीदा मुनष्यबळ उपलब्ध करून देण्याकरिता दरपत्रक मागविण्यात येत आहे. सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर कार्यालयासाठी 2 अकुशल शिपाई व 1 अर्धवेळ सफाईगार अकुशल पदांची सेवा आवश्यक असल्याचे सहायक आयुक्त श्रीमती खंदारे यांनी कळविले आहे. तरी जिल्ह्यातील कार्यरत असणाऱ्या तसेच उपरोक्त पदांची सेवा पुरविण्यास इच्छुक असणाऱ्या बेरोजगारांच्या सेवा पुरविणाऱ्या सहकारी संस्थांनी आपले दरपत्रक व इच्छापत्र दिनांक 12 फेब्रुवारी 2025 रोजी दुपारी 5 वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करावे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पार्क चौक, नॉर्थकोट, सोलापूर 413001 येथे प्रत्यक्ष अथवा दुरध्वनी क्र.0217-2992956 द्वारे संपर्क साधावा असे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त संगीता खंदारे यांनी कळविले आहे.

# विलासराव घुमरे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांच्या वाढदिवसानिमित्त यशवंत परिवार तसेच यशवंतराव चव्हाण महाविद्यालय करमाळा यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा तसेच विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम त्याचबरोबर दि.५ फेब्रुवारी रोजी रक्तदान शिबिराचे आयोजित करण्यात आले होते. यामध्ये तब्बल ८५ जणांनी सहभाग नोंदवला. दि.६ फेब्रुवारी रोजी गणेश शिंदे यांचे 'आयुष्यावर बोलू काही' या विषयावर व्याख्यान झाले असून पदवी प्रमाणपत्र वाटपाचा कार्यक्रम देखील झाला



यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात गेले आठवडाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये रांगोळी स्पर्धा, मिस मॅच डे फनी गेम्स, पारंपरिक वेशभूषा स्पर्धा, मुला मुलींसाठी शेलापागोटे, रक्तदान शिबीर आणि मिस वायसीएम अशा कार्यक्रमांचा यात समावेश आहे. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी व व्यक्तिमत्त्वाच्या पैलूंना विकसित करण्यासाठी हा सांस्कृतिक महोत्सव दरवर्षी आयोजित केला जातो.